12 JUIN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुस्तके घराला समृद्ध करतात : शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पुस्तकांमुळे घर समृद्ध होते. म्हणून ग्रंथ प्रदर्शनांना भेटी देऊन नागरिकांनी पुस्तके खरेदी करण्याची गरज असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले.

शाहू स्मारक भवन येथे आयोजित 'ग्रंथ कॉर्नर' प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रदर्शनाच्या माध्यमातून २८ जूनपर्यंत सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.




**कोल्हापूर येथील शाहू स्मारक भवनमध्ये आयोजित ग्रंथ कॉर्नरच्या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अलोक जत्राटकर, कृष्णाजी हरगुडे, युवराज कदम, प्रभाकर पाटील, सुभाष पाटील उपस्थित होते**

विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, प्रभाकर पाटील, कृष्णाजी हारगुडे, ग्रंथ कॉर्नरचे सुभाष पाटील उपस्थित होते. वाचकांनी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथ कॉर्नरच्या संचालिका शुभांगी पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स



राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. एस. आर. यादव यांना ग्रंथभेट देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे आदी.

# 'डॉ. यादव यांनी विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला'

कोल्हापूर टाइम्स टीम

'प्रा. एस. आर. यादव यांची संशोधनाप्रती समर्पण वृत्ती आणि निष्ठा ही अत्यंत आदर्शवत असून त्यांना मिळालेला राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार हा शिवाजी विद्यापीठाचाच गौरव आहे,' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख व वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयातर्फे देण्यात येणारा 'इ. के. जानकी अम्मल जीवन गौरव पुरस्कार' हा संशोधनातील सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. हर्षवर्धन यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्त विद्यापीठातर्फे डॉ. यादव यांचे अभिनंदन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. यादव यांनी वनस्पतीशास्त्रामध्ये जागतिक दर्जाचे संशोधन केले. त आपल्या संशोधनकार्याची पुस्तके त्यांनी विद्यापीठ प्रकाशनामार्फत प्रकाशित केली. त्या. माध्यमातून विद्यापीठही देशोदेशीच्या संशोधकांपर्यंत पोहोचले. डॉ. यादव यांच्या अथक प्रयत्नांतूनच विद्यापीठात जागतिक दर्जाचे 'लीड बॉटॅनिकल गार्डन' साकाराले. आजही त्यांचे संशोधन कार्य अखंडितपणे सुरू आहे. त्यांच्यामुळे विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाला संशोधन क्षेत्रात मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.'

या वेळी डॉ. यादव म्हणाले, 'राष्ट्रीय स्तरावरील इतक्या उंचीचा पुरस्कार हा केवळ माझी मातृसंस्था असलेल्या शिवाजी विद्यापीठामुळेच मिळू शकला. आजवर मी या मातृसंस्थेमुळेच घडलो. माझे संशोधन क्षेत्र असलेल्या 'टॅक्सॉनॉमीला' जीवशास्त्राची माता असे म्हटले जाते. त्या क्षेत्रात गेल्या तीस वर्षांत उत्तम संशोधनाची भर घालण्याचे कार्य हातून झाले, याचे समाधान आहे. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठातर्फे प्रशंसापत्र व ग्रंथभेट देऊन डॉ. यादव यांचा गौरव झाला. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्यासह वनस्पतीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. एस.एस. कांबळे, डॉ. एन.एस. चव्हाण, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. एन.बी. गायकवाड, डॉ. व्ही. डी. जाधव, डॉ. के.बी. पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2018
Times of India

# Varsity announces entrance test results online

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) announced the preliminary merit list for 28 entrance examinations on its website on Monday.

The university officials said the preliminary results for MSc, MCA, MBA, mass communication, among others — conducted via online mode earlier last month from May 22 to May 29 — have been announced.

According to the officials, students having any discrepancy can report to the varsity by June 14 as the final merit list will be announced on June 15. The admission rounds, according to the officials, will begin from June 19. The second round will be conducted on June 23 and the final round will be on June 26.

The officials added that other university quota seats and spot admissions (if required) will be announced later via separate notification. "There are few MA courses where in the response for the admission is low, the revised applications will be invited soon for the same," a SUK official said.

He added that the university after announcing the preliminary result on Monday has invited discrepancies from students till June 14 and they will proceed with the final merit list preparation accordingly.

According to the university circular, the entrance exam details have been made available on its website for the students. A separate admission 2018 link too has been provided on the website for information about the available courses.

With 40 different departmental courses, SUK conducts entrance examination for over 25 PG courses every year. Rest of the course fall in the social sciences, languages and political sciences and do not require entrance exam. The varsity had conducted its online and offline entrance exam earlier this year in the fourth week of May.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2018
पुढारी

# विद्यापीठात आज व्यवस्थापन परिषद बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी (दि.१२) दुपारी बारा वाजता व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2018
लोकमत

# व्यवस्थापन परिषदेची आज बैठक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक आज, मंगळवारी दुपारी एक वाजता होणार आहे. व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये बैठक होणार असून, त्यामध्ये विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2018
लोकमत

# मोरे यांचा आज सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मराठी चंदगडी बोली याबाबत संशोधन केले आहे. त्याबद्दल कोल्हापूर शिवसेनेतर्फे आज, मंगळवारी दुपारी बारा वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डॉ. मोरे यांचा सत्कार केला जाणार आहे, अशी माहिती विजय देवणे यांनी पत्रकाद्वारे दिली.